Lalita Gandbhir
4200 N.Ocean Drive, Apt 1501-2
Riviera Beach, FL 33404
U.S.A.
lalitagandbhir@hotmail.com
First Serial Right

## सॅमनचं पिल्लू

वाहत्या झऱ्यातलं
सॅमनचं पिल्लू
मला म्हणालं,
“आता मी महासागरात
फिरायला जातोय.
बाळांना जन्म द्यायला
परत येईन.
तेव्हा या झऱ्याकाठी
परत भेटू.”

## अलास्कात — २

सूर्यप्रकाशात चमचमणारा हिमनग (ग्लेशियर) मला म्हणाला,
“लवकरच पृथ्वीचं तपमान कमी करा,
नाही तर
माझ्या काळजाचं पाणी पाणी होईल.”

## अलास्कात — ३

रात्री दोन वाजता आकाशात तळपणारा सूर्य मला म्हणाला,
“थोडी विश्रांती घेऊन
परत येतो.
तोपर्यन्त घटकाभराची
रात्र होईल.”

## अलास्कात — ४

अलास्कात भराभर वाढताना दिसणाऱ्या
गवतांच्या पात्यांकडे
मी आश्चर्याने बघत होते.
ती पाती हसत हसत मला म्हणाली,
“अग वेडे, चोवीस तास
सूर्यप्रकाश आहे ना!
म्हणून आमची उंची
भराभर वाढतेय.

*ललिता गंडभीर, फ्लोरिडा.*